# बृहन्मुंबई महानगरपालिका
# आपत्कालीन व्यवस्थापन विभाग
# १७ ऑगस्ट ते १८ ऑगस्ट २०२० पर्यंतचा पावसाळी परिस्थितीचा अहवाल
# (सकाळी ८.०० ते सकाळी ८.००, २४ तास)

१. पाऊस (कुलाबा वेधशाळा ) :

| हवामान केंद्र | २४ तासांचा पाऊस (मिमी) | १७ ऑगस्ट २०२० पर्यंतचा एकूण पाऊस (मिमी) | वार्षिक सरासरी पाऊस (मिमी) | २०२० पावसाची टक्केवारी | १७ ऑगस्ट २०१९ पर्यंतचा एकूण पाऊस (मिमी) | २०१९ पावसाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| कुलाबा | १६.२ | २५७१.५ | २२९२ | ११२.१९% | १८१६.६ | ८२.४६% |
| सांताक्रूझ | ४४.७ | २७७६.६ | २६६८ | १०४.०७% | २४९८.८ | ९९.४०% |

२. मनपाच्या स्वयंचलित केंद्रांवर नोंदविण्यात आलेला सरासरी पाऊस :

| विभाग | २४ तासांचा पाऊस (मिमी) | १७ ऑगस्ट २०२० पर्यंतचा एकूण पाऊस (मिमी) | शहर व उपनगरातील सरासरी पाऊस (मिमी) | मुंबईत झालेला एकूण सरासरी पाऊस (२४८०) (मिमी) |
|---|---|---|---|---|
| शहर | ३५.४६ | २१५५.३३ | ९४.०४% | ८६.०८% |
| पूर्व उपनगरे | ५४.०४ | २१०८.३ | ७९.६३ % | |
| पश्चिम उपनगरे | ४३.११ | २१४०.८६ | | |

३. तापमान :

| स्थळ | कमाल | किमान |
|---|---|---|
| कुलाबा | २८.२ | २५.५ |
| सांताक्रूझ | २८.६ | २४.६ |

४. समुद्राची भरती :

| दिनांक | भरतीची वेळ | लाटांची उंची | दिनांक | ओहोटीची वेळ | लाटांची उंची |
|---|---|---|---|---|---|
| १८.०८.२०२० | सकाळी ११:३९ | ४.४२मीटर | १८.०८.२०२० | सायं. ०५:३८ | १.५१ मीटर |
| १८.०८.२०२० | रात्रौ ११:३४ | ३.९३ मीटर | १९.०८.२०२० | सकाळी ०५:३१ | ०.४४ मीटर |
| १९.०८.२०२० | दुपारी १२:१७ | ४.६१मीटर | १९.०८.२०२० | सायं. ०६:१८ | १.२१ मीटर |

५. हवामान अंदाज: कुलाबा वेधशाळेने पुढील २४ तासांकरिता वर्तविलेल्या अंदाजानुसार मुंबई शहर व उपनगरांत आकाश सामान्यतः ढगाळ राहून **हलका ते मध्यम स्वरुपाचा** पाऊस पडेल.

६. <u>तलाव क्षेत्रातील पाऊस :</u>

जल अभियंता विभाग

मुख्य नियंत्रण कक्ष भांडूप संकुल

दिनांक १८.०८.२०२० रोजी सकाळी ६ वा. नोंदविण्यात आलेला तलावांच्या पातळीबाबतचा तपशील

| तलाव | पूर्ण पुरवठा पातळी (मिटर्समध्ये) | पाणी मिळण्याची कमीत कमी पातळी (मिटर्समध्ये) | वर्ष | आजची पातळी (मिटर्समध्ये) | वाढ / घट (मिटर्समध्ये) | उपायुक्त पाण्याचा साठा (दशलक्ष लिटर्समध्ये) (एमएल) | उपयुक्त पाण्याचा साठा टक्केवारी (एमएल) | दिनांक १७.०८.२० पडलेला पाऊस (मिमी) | एकूण पाऊस (मिमी) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अप्पर वैतरणा | ६०३.५१ (एमएसएल) | ५९५.४४ (एमएसएल) | २०२० | ६०१.२३ | ०.२८ | १५३६५६ | ६७.६८ | २८.०० | १७००.०० |
| | | | २०१९ | ६०२.७८ | | २०३७८९ | ८९.७६ | १२.०० | ३३१५.०० |
| मोडक सागर | १६३.१५ (टीएचडी) | १४३.२६ (टीएचडी) | २०२० | १६२.९० | ०.६९ | १२७४१० | ९८.८३ | ६९.०० | १७१७.०० |
| | | | २०१९ | १६३.१६ | | १२८९२५ | १००.०० | ७.०० | ३३९४.०० |
| तानसा | १२८.६३ (टीएचडी) | ११८.८७ (टीएचडी) | २०२० | १२७.८० | ०.५५ | १२९३९३ | ८९.१९ | ९५.०० | १४७४.०० |
| | | | २०१९ | १२८.५७ | | १४३८८७ | ९९.१८ | ५.०० | ३०७४.०० |
| मध्य वैतरणा | २८५.०० (टीएचडी) | २२०.०० (टीएचडी) | २०२० | २८१.५७ | ०.९२ | १७३४१८ | ८९.६१ | ३९.०० | १८४०.०० |
| | | | २०१९ | २८३.४४ | | १८४७७८ | ९५.४८ | ६.०० | ३१६९.०० |
| भातसा | १४२.०७ (एमएसएल) | १०४.९० (एमएसएल) | २०२० | १३६.९१ | १.०७ | ५८१०२१ | ८१.०३ | ८८.०० | १९५६.०० |
| | | | २०१९ | १४०.२२ | | ६६६२८१ | ९२.९२ | ३.०० | ३२४०.०० |
| विहार | ८०.१२ (टीएचडी) | ७३.९२ (टीएचडी) | २०२० | ८०.३५ | ०.०५ | २७६९८ | १००.०० | ५२.०० | २५५३.०० |
| | | | २०१९ | ८०.१९ | | २७६९८ | १००.०० | ०.०० | २९८६.०० |
| तुळशी | १३९.१७ (टीएचडी) | १३१.०७ (टीएचडी) | २०२० | १३९.३० | ०.०६ | ८०४६ | १००.०० | ६९.०० | ३१४०.०० |
| | | | २०१९ | १३९.२० | | ८०४६ | १००.०० | ९.०० | ३७१३.०० |
| एकूण | | | | | २०२० | १२००६४२ | ८२.९५ | | |
| | | | | | २०१९ | १३६३४०३ | ९४.२० | | |
| | | | | | २०१८ | १३१८२२२ | ९१.०८ | | |

- तुळशी तलाव दि. २७.०७.२०२० रोजी, दुपारी १२:०० वा पासून भरुन वाहू लागला आहे.
- विहार तलाव दि. ०५.०८.२०२० रोजी, रात्रौ १०:०० वा पासून भरुन वाहू लागला आहे.

७. <u>पाणी साचणे:</u> निरंक

८. <u>घर / भिंतीचा भाग पडण्याच्या तक्रारीः</u> पुर्व उपनगरात ०२ व पश्चिम उपगनगरात ०२ **अशा एकुण ०४ ठिकाणी** घराचा / भिंतीचा भाग पडण्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या. सदर तक्रारी संबधित विभांगाना कळवुन मदतकार्य रवाना करण्यात आले.

दि. १७.०८.२०२० रोजी रात्रौ ८.३८ वा. आपत्कालीन व्यवस्थापन विभागाच्या मदतसेवा क्रमांक १९१६ वर एका नागरिकाने शर्ले राजन रोड, कल्पना इमारतीच्या जवळ, बांद्रा पश्चिम येथे रिकाम्या असलेल्या इमारतीचा भाग शेजारच्या इमारतीवर कोसळल्याची माहिती दिली. माहिती प्राप्त होताच सुनिश्चित कार्यपध्दतीनुसार अग्निशमन दल, पोलीस, १०८ रुग्णवाहिका व विभागीय नियंत्रण कक्षास कळवून मदतकार्य रवाना करण्यात आले. अग्निशमन दल नियंत्रण कक्ष व स्थानिक विभाग यांच्याकडून प्राप्त माहितीनुसार तळमजला अधिक दोन मजले असे बांधकाम असलेल्या खाजगी रिकामी इमारतीचा काही भाग रस्ता व त्यालगत असलेल्या दुस-या इमारतीच्या संरक्षक भिंतीवर पडला. अग्निशमन दलामार्फत सदर घटना स्तर-३ ची घोषीत करुन घटनास्थळी ८ फायर इंजिन, १ रेस्क्यु व्हॅन पाठविण्यात आली. एच/पश्चिम विभागामार्फत घटनास्थळी ४ जेसीबी, ५ डंपर्स, २२ कामगार, दूय्यम अभियंता, सहाय्यक अभियंता पाठविण्यात आले.

सदर घटनेत दोन माणसे जखमी झाली. जखमींना अनुक्रमे बांद्रा भाभा रुग्णालय व लिलावती रुग्णालय येथे दाखल करण्यात आले. लिलावती रुग्णालयात दाखल असणा-या श्री. **ब्रुस मायकल डिफेना, वय ४१ यांना आज सकाळी ९.१९ वा. मृत घोषीत करण्यात आले असून श्री. अर्जुन रामासागर पंडीत, वय २५ वर्षे यांनी बांद्रा भाभा रुग्णालयातून स्वतःहून डिस्चार्ज घेतला आहे.**

घटनास्थळी इमारतीचा मलबा उचलण्याचे काम सुरु आहे.

९. <u>झाडे / फांदया पडण्याच्या तक्रारीः</u> शहरात ०५ व पुर्व उपनगरात ०७ **अशा एकुण १२ ठिकाणी** झाडे व फांद्या पडण्याच्या तक्रारी नागरिकांकडून प्राप्त झाल्या. सर्व तक्रारी पडताळणी करिता संबंधित विभागांना कळविण्यात आलेल्या आहेत. झाडे व फांद्या तोडण्याचे काम सुरु आहे. **मार नाही.**

१०. <u>शॉर्टसर्किटः</u> पुर्व उपनगरात ०३ व पश्चिम उपनगरात ०३ **अशा एकुण ०६ ठिकाणी** शॉर्टसर्किटच्या घटना घडल्या, सदर तक्रारी विद्युत पुरवठा यंत्रणांना कळवून मदतकार्य रवाना करण्यात आले आहे. **मार नाही.**

११. <u>दरड कोसळणेः</u> दि.१७.०८.२०२०रोजी अग्निशमन दलामार्फत प्राप्त माहितीनुसार सकाळी १०.०२ वा. बुध्द पर्णकुटीर मंदीर, सुंदर बाग, संगम सोसायटी जवळ, कुर्ला पाईप लाईन, कुर्ला पश्चिम या ठिकाणी दरडीचा काही भाग पडुन बुध्द पर्णकुटीर मंदीराच्या कळसाचा काही भाग व भिंत यांचे नुकसान झाले होते. सदर ठिकणी सुरक्षिततेचा उपाय म्हणुन दोन घरे रिकामी करण्यात आली आहेत व अग्निशमनदल व संबंधित विभागामार्फत धोकादायक भाग बाजूला करण्यात आला आहे. **मार नाही.**

१२. <u>वाहतुक व्यवस्थाः</u>**- (आज सकाळी ८.०० वा. प्राप्त माहितीनुसार)**

- मुंबई शहर व उपनगरातील वाहतुक **सुरळीत आहे.**

१३. <u>विशेष माहितीः</u>

१. दि.१७.०८.२०२० रोजी अग्निशमन दलामार्फत प्राप्त माहितीनुसार सकाळी ११.०६ वा. सुतार चाळ, मोहम्मद अली रोड, जामा मस्जिदच्या मागे भेंडीबजार या ठिकाणी दुकानामध्ये आग लागली. सदर आग सकाळी ११.४० वा. स्तर २ घोषीत करण्यात आली. सदर आग ४ फायर इंजिन, ४ जंबो टँकर्स व १ बीए व्हॅन यांच्या सहाय्याने दुपारी १.२५ वा. पूर्णपणे विझविण्यात आली. मार नाही.

२. दि.१७.०८.२०२० रोजी अग्निशमन दलामार्फत प्राप्त माहितीनुसार सायं ५.२० वा. माऊंट मेरी सोसायटी, तानसा पाईप लाईन जवळ, टिळक नगर, चेंबूर पश्चिम या ठिकाणी एलपीजी सिलेंडर मधून गॅस गळती होऊन एका घरात आग लागली. सदर आगीमध्ये जखमी झालेल्या दोघांना राजावाडी रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले. कर्तव्यावरिल वैद्यकिय अधिका-यांकडून प्राप्त माहीतीनुसार सौम्या चंद्रा सिंग, स्त्री, वय २२ वर्षे ही १५ ते २० % तर चंद्रा तारा सिंग, पु. वय २५ वर्षे ४० ते ५० टक्के भाजले आहेत. दोन्ही जखमींवर उपचार सुरु आहेत.

*******